(१४)

नागरिकांच्या सनदेतील तरतूदीनुसार
आवश्यक कार्यवाही न करणाऱ्या
संबंधिताविरुध्द महाराष्ट्र शासकीय
कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि
शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या
विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील
कलम १० नुसार कारवाई करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
**शासन परिपत्रक क्रमांक : नासद-२००९/ प्र.क्र ८०/०९/१८ अ.**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ४ ऑगस्ट, २००९

वाचा :- १.शासन परिपत्रक ,सामान्य प्रशासन विभाग क्र.नासद-२००७/११५/प्र. क्र. १८/०७/१८-अ
दिनांक १३ ऑगस्ट २००७.

२. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.नासद-२००९/४३२/प्र.८०/०९/१८-अ
दिनांक २३ जुलै २००९,

३. शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. नासद- २००८/प्र.क्र.१०३/०८/१८ अ,
दि. ३.८.२००९

शासन परिपत्रक :-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (२) मधील तरतूदीनुसार प्रत्येक विभाग आणि त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयाला नागरिकांची सनद तयार करुन प्रसिध्द करावयाची आहे.

२. नागरिकांची सनद तयार करुन ती रेडिओ, दुरदर्शन इत्यादि माध्यमातून नागरिकांना उपलब्ध करुन देण्याच्या सूचना संदर्भाधीन दि.१३ ऑगस्ट २००७ च्या परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. नागरीकांची सनदेची प्रसिध्दी लोकराज्य मासिकात करणे, याबाबत संदर्भाधीन दि.२३ जुलै २००९ व ती कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावणे याबाबत दि. ३ ऑगस्ट २००९ च्या परिपत्रकानुसार आवश्यक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

....२/-

३. संबंधित कार्यालयातून ज्या सेवा नागरिकांना पुरविल्या जातात त्या सेवांबाबत खालीलप्रमाणे पाटिती संबंधित कार्यालयाने त्यांच्या कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावयाची आहे.

| अ.क्र | सेवांचा तपशिल | सेवा पुरविणारे अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व हुद्दा | सेवा पुरविण्यासाठी विहीत मुदत | सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांचे नांव व हुद्दा. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

४. ज्या कार्यालयांनी वरीलप्रमाणे नागरिकांची सनद कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावण्याची कार्यवाही अद्याप केलेली नसेल त्यांनी ती त्वरित पूर्ण करुन तदसंबंधीचा पूर्तता अहवाल संबंधित भागांमार्फत सामान्य प्रशासन विभाग (र. व का.) यांना विनाविलंब पाठवावा.

५. संबंधित कार्यालयाने तयार केलेल्या सनदेतील तरतूदीनुसार विहीत मुदतीत सेवा पुरविण्यात जाणूनबुजून वा हेतूपुरस्सर जे अधिकारी / कर्मचारी विलंब करतील त्या अधिकारी / कर्मचाऱ्याच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यास सक्षम प्राधिकाऱ्याने महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम १० मधील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई सुरु करणे आवश्यक आहे.

वरीलप्रमाणे सर्व सक्षम प्राधिकाऱ्यांनी कलम १० मधील तरतूदीनुसार कारवाई करावी.

७. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २००९०८०४१९०९०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(स. मा. सावळे)
उप सचिव

प्रति,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव
मा.राज्यपालांचे सचिव.

..३/-

१५



प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
महाप्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकआयुक्त यांचे कार्यालय
सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (५ प्रती)
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद ), मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व मंत्रालयीन विभाग
मंत्रालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख
प्रत,
मुख्य सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक
निवड नस्ती (कार्यासन १८-अ